# द रोझेबल लाईन : रंजक कादंबरी




**आश्विन संघीची आपल्या रोझाबल लाईनच्या नवीन पेपरबक आवृत्तीत उकल करण्याचा प्रांजळ प्रयत्न केला आहे. धर्म आणि कटकारस्थाच्या सिद्धांताचा तुलनात्मक मिलाफ म्हणजेच पुस्तकातील काल्पनिकतेची डॅन ब्रॉनच्या 'द विन्सी कोड'सह तुलना झाली आहे. तथापी होल्जर कास्टर्न यांच्या डिसल लिल्डइन इंडिया आणि निकोलस नोटेविच यांच्या ' द अननोन लाईफ ऑफ मिझस' यांसह बऱ्याच पुस्तकांवर ऐतिहासिक कल्पना आधारली आहे.**

धगधगते अग्निकुंड बनलेल्या काश्मिरकडे गेल्या काही वर्षापासून पाश्चिमात्य देशातील पर्यटकांनी पाठ फिरवली आहे; मात्र कोणताही झगमगाट नसलेल्या एका छोटेखानी तीर्थस्थानांकडे जे रोझाबल वस्तीत वसले आहे. परदेशी पर्यटकांचा ओढा वाढतच आहे. मध्यकालीन यवनी संत युझ असफ यांची समाधी रोझाबलमध्ये आहे; मात्र त्या समाधीचा येशू ख्रिस्ताच्या थडग्याशी त्याचा बादारायण संबंध जोडला जाण्यासाठी कित्येक दंतकथा आहेत. अश्विन संघी यांनी शब्दबध्द केलेला 'द रोझाबल लाईन' नावाच्या 'द विन्सी कोड – टाईन'च्या महिलासह हल्ली बरेच लिखाण झाले आहे आणि त्याचा परिपाक म्हणून श्रीनगरमधील या तीर्थस्थळी पर्यटकांची रीघ लावली आहे.

संधीच्या या काल्पनिक विक्रीचे नवनवीन उच्चांक गाठत असलेल्या संधीच्या या कादंबरीतील प्रत्येक पानावर वाचक बुचकळ्यात पडतो; मात्र त्याचबरोबर लेखक हे सुद्धा विशद करतात की, वाचकाने त्याकडे इतिहास म्हणून नव्हे तर एक कथा म्हणून पाहावे.

आश्विन संघीची आपल्या रोझाबल लाईनच्या नवीन पेपरबक आवृत्तीत उकल करण्याचा प्रांजळ प्रयत्न केला आहे. धर्म आणि कटकारस्थाच्या सिद्धांताचा तुलनात्मक मिलाफ म्हणजेच पुस्तकातील काल्पनिकतेची डॅन ब्रॉनच्या 'द विन्सी कोड'सह तुलना झाली आहे. तथापी होल्जर कास्टर्न यांच्या डिसल लिल्डइन इंडिया आणि निकोलस नोटेविच यांच्या ' द अननोन लाईफ ऑफ मिझस' यांसह बऱ्याच पुस्तकांवर ऐतिहासिक कल्पना आधारली आहे.

त्याचा पुरावा म्हणून ही कादंबरी आपल्याला मसापोटेमिया ते मगध जेरूसलेम ते रोम येथपर्यंत फिरवून आणते. 'भगवान बुध्द आणि येशू ख्रिस्तानी चाळीस दिवस उपवास केला व रात्र याबद्दल मी विस्मयचकीत झाले आहे. ख्रिस्ती धर्मात दिला जाणारा बाप्तिस्मा व कुंभ मेळ्यातील साधर्म्य मला अतुलनीय वाटते. रोमांकित झालेले अश्विन संधी असे म्हणतात.

धर्म आणि इतिहास यांचा मिलाफ झालेल्या व रोझाबाल लाईन वाचकांनी प्रचंड प्रतिसाद दिला आहे. वाचकांच्या प्रतिसादाने भारावलेल्या लेखकांनी ह्यावर आधारीत एक चित्रपट काढण्याचा मानस व्यक्त केला. लेखकाने एक गोष्ट एकदम स्पष्ट केली आहे की त्यांचे लिखाण म्हणजे कल्पनाविलास आहे. (मात्र ब्राऊन ह्यांनी गुप्त इतिहास म्हणून खपवण्याचा प्रयत्न केला आहे.) दोन गोष्टीनी संधना हे पुस्तक शब्दबध्द करण्यासं प्रेरित केले. वाचकांशी साधलेल्या संवादात ते म्हणतात, 'समाधीची जी सध्याची दुरावस्था झाली आहे. आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर दाखवली जाणारी अनास्था मला जड जाते ही समाधी आणि यामध्ये जो कोणी चिरनिद्रा घेत आहे. त्याला कुर्निसात आणि माझी वैयक्तीक सलाम म्हणजे माझी कादंबरी हया लिखाणात मला जे काही मिळते ते सर्व धन मी जागतिक किर्तीच्या हया खजिन्याचे जतन करण्यासाठी मी वापरीन. 'आणि हो सर्वात महत्वाचे म्हणजे समाजातील तळागाळातील व्यक्तीला मला हेच सांगायचे आहे कि जगातील प्रत्येक धर्म एकमेकांशी संगत आहे. आपण फक्त आपल्या परीने त्याचे रुप पाहतो व सर्वांत महत्वाचे म्हणजे मानवतावादी केंद्रस्थानी ठेवून गुण्यागोविंदाने राहणे हेच आपल्या धर्माधर्मात वाढत्या तेवढीच्या जमान्यात अनन्यसाधारण महत्वाचे आहे.'